सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २५३ | शुक्रवार, दि. ५ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com



**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १५०६००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३९४००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११५५००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २५७०/-
भाव प्रती १० ग्राम





## आतील पानांत


बदलते वैवाहिक नातेसंबंध आणि कायद्याची भूमिका संरक्षण, जबाबदारी आणि संतुलित न्यायाचा शोध

पान २ वर




अमलनेर : पंचदिन साध्य विष्णू पंचायतन यागाच्या दुसऱ्या दिवशी यजमान डॉ. सुप्रिम पाटील, हरिश्चंद्र चौधरी व मनोहर दीक्षित यांनी सपत्नीक एकादशनी रुद्र अभिषेक करताना. (छायाचित्र : मयूर चौधरी)

# श्री विष्णू पंचायतन यागाचा दुसरा दिवस संपन्न

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात 'पंचदिन साध्य विष्णू पंचायत याग' आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम बुधवार, दिनांक ३ जून रोजी सकाळी ९ वाजता संकष्टी चतुर्थीच्या पवित्र पर्वावर सुरू झाला आहे.आज दि.४ रोजी सकल देवता प्रातः पूजन करण्यात आले. या यागाचे मुख्य यजमान म्हणून अखिल भारतीय भाविक वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष तथा समाजकार्य फाउंडेशनचे मुख्य यजमान डॉ. सुप्रिम पाटील यांनी सहकुटुंब पूजा-अर्चा केली. त्यांच्यासोबत हरिश्चंद्र पांडुरंग चौधरी आणि मनोहर दीक्षित हे देखील यजमान म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमात महादेव पीठ व यंत्र देवता सथापन करून एकादशनी रुद्र अभिषेक,१ हजार बिल्व अर्चन ,रुद्र हवन विशेष आहुती (बेलपान /बेलफळ),सायंकाळी स्तुति पाठ ,पुरुषोत्तम मास माहात्म्य संगीतमय कथा आणि आरती सह संपन्न करण्यात आले. तसेच, अधिकमास महात्म्य कथा आणि विविध पूजा-अर्चा करण्यात आल्या.अधिकमासात भगवान विष्णू आणि महालक्ष्मी यांच्या कृपेसाठी आणि नवग्रहांच्या पूजेसाठी हा याग केला जातो. या यागामुळे घरात सुख-शांती लाभते आणि ग्रह दोष निवारण होण्यास मदत होते, अशी मान्यता आहे.अधिकमास माहात्म्य कथेचे निवेदक नाशिक निवासी व्यास आचार्य श्री.वे.मू.हशिश कुलकर्णी गुरुजी यांनी आपल्या अमोघ वाणीतून कथा सांगितली.यावेळी मंगळग्रह सेवा संस्थेचे मंगळग्रह मंदिरातील गुरुजी चंद्रकांत जोशी सह सर्व गुरुजी, मंगल सेवेकरी आणि भाविक उपस्थित होते.

# अकाली निधन झालेल्या गुमास्ता नितीन पाटील यांच्या कुटुंबाला बाजार समितीकडून आर्थिक मदतीचा हात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : श्रीमती वैशाली पाटील यांना आर्थिक मदतीचा धनादेश देतांना कृषी बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, उपसभापती सुरेश पाटील, संचालक शरद पाटील आदी.

अमळनेर : येथिल अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे गुमास्ता नितीन केशव पाटील यांचे दुःखद निधन झाल्यामुळे त्यांच्या परिवाराला बाजार समितीकडून आर्थिक मदतीचा धनादेश देण्यात आला.

गुमास्ता म्हणून कार्यरत असलेले नितीन पाटील यांचे अकाली निधन झाले. त्यांना बाजार समितीतर्फे पन्नास हजार रुपयाचा धनादेश, सोबत मानधन श्रीमती वैशाली नितीन पाटील यांना बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील, उपसभापती सुरेश पिरन पाटील, संचालक शरद पाटील यांचे हस्ते देऊन आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी बाजार समितीचे संचालक नितीन पाटील, समाधान धनगर, प्रकाश अमृतकार, अर्बन बँकेचे संचालक रणजित शिंदे, सचिव डॉ.उन्मेष राठोड, उपसचिव अशोक वाघ, योगेश महाजन, प्रशांत राणे सह कर्मचारी व सर्व गुमास्ता बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी व्यापारी बांधवांकडूनही आर्थिक मदत करण्यात येईल असे जाहीर करण्यात आले.

### बँकेच्या नावाने गंडा घालण्याचा प्रयत्न

# सतर्कतेमुळे शेतकरी फसवणुकीतून बचावला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



सदर इमेज एआय आधारीत आहे.

अमळनेर : तालुक्यातील एका गावातील शेतकऱ्याला नामांकित बँकेच्या नावाने फसवण्याचा प्रयत्न उघडकीस आला असून, मुलाच्या सतर्कतेमुळे मोठी आर्थिक फसवणूक टळली. संबंधित व्यक्तीने स्वतःला बँकेचा अधिकारी असल्याचे भासवून शेतकऱ्याकडून पैसे उकळल्याची घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एकदम थाटामाटात आणि हातात बॅग घेऊन एक व्यक्ती गावात दाखल झाला. त्याने एका शेतकऱ्याच्या घरी जाऊन स्वतःला नामांकित बँकेचा प्रतिनिधी असल्याचे सांगितले. तसेच, शासनाच्या विशेष योजनेअंतर्गत दोन लाख रुपये खात्यावर जमा होणार असल्याचे आमिष दाखवले.

यावेळी शेतकऱ्याने माझे त्या बँकेत कोणतेही खाते नसल्याचे स्पष्ट सांगितले. मात्र, त्या व्यक्तीने विविध कारणे सांगून शेतकऱ्याची दिशाभूल केली आणि त्याला अमळनेर येथे बोलावून घेतले. तेथे प्रक्रियेसाठी शुल्क लागणार असल्याचे सांगत कोणतीही कागदपत्रे न मागता त्याच्याकडून दहा हजार रुपये घेतले. तसेच, आठ दिवसांत दोन लाख रुपये खात्यात जमा होतील, असे आश्वासन दिले.

दरम्यान, शेतकऱ्याने ही बाब आपल्या मुलाला सांगितल्यानंतर त्याला संशय आला. त्याने संबंधित व्यक्तीचा संपर्क क्रमांक मिळवून त्याच्याशी संपर्क साधला. त्याचवेळी संबंधित बँकेच्या व्यवस्थापकांशीही चर्चा केली. व्यवस्थापकांनी शेतकऱ्याचे त्या बँकेत खातेच नसल्याचे स्पष्ट करत अशा प्रकारची कोणतीही योजना नसल्याचे सांगितले. तसेच, या नावाचा आमचा कोणताही प्रतिनिधी नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर शेतकऱ्याच्या मुलाने त्या व्यक्तीला बँकेजवळ भेटण्यासाठी बोलावले. प्रकार उघडकीस येण्याची शक्यता लक्षात येताच संबंधित व्यक्ती पुन्हा गावात गेला आणि शेतकऱ्याच्या घरी जाऊन घेतलेल्या रकमेपैकी सात हजार रुपये परत केले. उर्वरित तीन हजार रुपयेही लवकरच परत देण्याचे आश्वासन देत त्याने माफी मागितली. तसेच, हा प्रकार कोणालाही सांगू नये, अशी विनंती केल्याचे समजते.

या घटनेमुळे ग्रामीण भागात बँका, सरकारी योजना आणि आर्थिक लाभांच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. नागरिकांनी कोणतीही रक्कम भरण्यापूर्वी संबंधित बँक किंवा कार्यालयाशी खातरजमा करावी, तसेच अशा संशयास्पद व्यक्तींपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.













## संपादकीय

# संघर्षाची धग आणि यशाची पहाट – एक नवी सुरुवात

आयुष्याच्या प्रवासात आपण अनेकदा अशा टप्प्यावर येऊन थांबतो, जिथे समोर पसरलेली धुक्याची चादर पुढची वाट स्पष्टपणे दिसू देत नाही. अशा वेळी "सगळे रस्ते बंद झाले आहेत," ही भावना मनात घर करते. मात्र, निसर्गाचा हा एक अटळ नियम आहेरस्ते कधीच बंद होत नसतात, रस्ते फक्त आपली दृष्टी थोड्या काळासाठी मर्यादित करतात. खरा विजय हा परिस्थिती बदलण्याची वाट पाहण्यात नाही, तर ती परिस्थिती आपल्या जिद्दीने बदलण्यात असतो. आजचा संघर्ष हा तुमच्या भविष्यातील यशाचा पाया आहे. ज्याप्रमाणे कोळशावर प्रचंड दाब आणि उष्णतेचा मारा झाल्यानंतरच तो हिऱ्याच्या रूपात चमकतो, त्याचप्रमाणे मानवी आयुष्यातील प्रत्येक कठीण प्रसंग हा आपल्याला अधिक सक्षम, अधिक तेजस्वी बनवण्यासाठी आलेला असतो. भूतकाळातील अपयश ही केवळ अनुभवाची शिदोरी असते; ती तुमच्या भविष्याला कलंकित करणारी डाग नसतात. महत्त्वाची असते ती आजची नवीन सकाळ आणि त्यासोबत आलेली नवी जिद्द.

यशस्वी व्यक्तींच्या इतिहासावर नजर टाकली तर एक गोष्ट स्पष्ट होते. कोणतीही मोठी निर्मिती एका रात्रीत होत नाही. ताजमहालाची भव्यता जशी हजारो कारागिरांच्या संयमाने आणि प्रत्येक दगडात कोरलेल्या तपस्येने उभी राहिली, तसेच तुमचे यश हे तुमच्या दैनंदिन छोट्या प्रयत्नांतून साकार होणार आहे. थेंब-थेंब साचून जसा अथांग सागर निर्माण होतो, तसाच तुमच्या रोजच्या छोट्या पावलांचा प्रवास एका दिवशी महासागरासारख्या यशात रूपांतरित होईल.या प्रवासात स्वतःची स्पर्धा इतरांशी लावणे चुकीचे आहे. जगाकडे पाहताना हेवा करण्यापेक्षा, 'कालच्यापेक्षा आज मी १ टक्का तरी कसा चांगला बनेल?' या विचाराने स्वतःला सिद्ध करणे, हीच खरी प्रगती आहे. समाजात नकारात्मकतेचे वारे वाहणारे अनेक असतात, लोकांचे काम बोलणे असते, परंतु तुमचे काम करून दाखवण्याचे आहे. लोकांच्या शब्दांकडे दुर्लक्ष करून, आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करणाराच खरा विजेता ठरतो.

लक्षात ठेवा, तुमच्या आयुष्याचे सारथी तुम्ही स्वतः आहात. तुमचे नशीब लिहिण्याची लेखणी दुसऱ्यांच्या हातात देऊन तुम्ही आयुष्याची बाग फुलवू शकत नाही. पाय जमिनीवर घट्ट रोवून आणि नजर आकाशातील ध्येयावर ठेवून जेव्हा तुम्ही कष्टाच्या मार्गावर चालता, तेव्हा यशाचे शिखर तुमच्यासाठी लांब नसते. म्हणून, नकारात्मकतेचे दरवाजे कायमचे बंद करा आणि आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवा. उठून उभे राहा, कारण तुम्ही पडलात म्हणून हारलेली नाही, तर तुम्ही धुळीतून पुन्हा झेप घेतलीत, तरच तुम्ही जिंकलात! आजची सकाळ तुमची आहे, आणि तुमची स्वप्ने पूर्ण करण्याची ताकदही केवळ तुमच्याकडेच आहे. तुमच्या ध्येयाचा प्रवास सुरू करताना, आजच्या दिवसातील सर्वात मोठे आव्हान कोणते आहे असे तुम्हाला वाटते?

# बदलते वैवाहिक नातेसंबंध आणि कायद्याची भूमिका

## संरक्षण, जबाबदारी आणि संतुलित न्यायाचा शोध

सध्या भारतभरात गाजत असलेले 'त्विशा शर्मा मृत्यू प्रकरण' असो वा 'विस्मया नायर हुंडाबळी प्रकरण', यांसारख्या घटनांमुळे वैवाहिक नात्यांमधील वाढती क्रूरता आणि गुंतागुंत प्रकर्षाने चव्हाट्यावर आली आहे. मुळात, भारतीय समाजात विवाह ही केवळ दोन व्यक्तींची युती नसून, दोन कुटुंबे, मूल्ये आणि संस्कारांचा सुरेख संगम मानला जातो. मात्र, अलीकडच्या काळात या पवित्र नात्याला तडे जात असल्याचे विदारक वास्तव नाकारता येत नाही. पती-पत्नीतील मतभेद, मानसिक तणाव, कौटुंबिक हस्तक्षेप, वाढत्या आर्थिक अपेक्षा, सामाजिक दबाव आणि संवादाचा अभाव यामुळे आज वैवाहिक नात्यांमध्ये कमालीचा ताण निर्माण झाला आहे. परिणामतः, कौटुंबिक हिंसाचार, हुंड्यासाठी छळ आणि आत्महत्यांसारख्या गंभीर घटना तर वाढल्या आहेतच; पण त्याचबरोबर सूडबुद्धीने केल्या जाणाऱ्या खोट्या आणि अतिरंजित तक्रारींमुळे न्यायालयांतील खटल्यांचे प्रमाणही लक्षणीयरीत्या वाढले आहे.

सद्यस्थितीत वैवाहिक नात्यात आलेला आणखी एक लक्षवेधी बदल म्हणजे स्त्री-पुरुषांचे वाढते आर्थिक स्वातंत्र्य. महिलांचे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणे हे समाजाच्या प्रगल्भतेचे आणि प्रगतीचे लक्षण आहे. परंतु, यामुळे पारंपरिक कौटुंबिक भूमिकांमध्येही मोठे स्थित्यंतर घडून आले आहे. जेव्हा या बदललेल्या भूमिकांचा निकोप आणि सामंजस्याने स्वीकार करण्याऐवजी नात्यात 'आर्थिक वर्चस्व' किंवा 'अहंकार' डोके वर काढतो, तेव्हा तिथे वादाची ठिणगी पडते. आधुनिक काळातील वैवाहिक नाते हे कोणाच्याही 'अवलंबित्वावर' नसून, ते समानतेवर आणि 'भागीदारीवर' आधारलेले असते, हे वास्तव आजच्या तरुण पिढीने अंगीकारणे काळाची गरज बनली आहे.

**नाण्याची दुसरी बाजू:**

समाजातील एक विदारक सत्य हे आहे की, आजही अनेक विवाहित महिलांना प्रत्यक्ष हुंडाबळी, शारीरिक आणि मानसिक अत्याचार यांसारख्या क्रूरतेला सामोरे जावे लागते. परंतु, नाण्याची दुसरी बाजूही तितकीच गंभीर आहे; काही प्रकरणांमध्ये संपूर्ण कुटुंबाला जाणीवपूर्वक आणि सूडबुद्धीने गंभीर आरोपांच्या फेऱ्यात अडकवले जाते. या गुंतागुंतीच्या वास्तवाकडे एकांगी दृष्टिकोनातून पाहणे आणि निष्कर्ष काढणे न्यायतत्त्वाला धरून नाही. कारण, प्रत्येक प्रकरणामागे एक वेगळी मानवी शोकांतिका, भिन्न परिस्थिती आणि दडलेले सत्य असते. भारतीय न्यायव्यवस्थेने या संवेदनशील विषयात वेळोवेळी अत्यंत समतोल आणि प्रगल्भ भूमिका बजावली आहे. 'अर्नेश कुमार विरुद्ध स्टेट ऑफ बिहार' यांसारख्या ऐतिहासिक निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने वैवाहिक प्रकरणांत (विशेषतः भारतीय दंड संहितेच्या कलम 498-अ अंतर्गत) तत्काळ अटकेची कारवाई करण्याबाबत तपासयंत्रणांनी संयम आणि विवेकबुद्धी बाळगण्याची सक्त ताकीद दिली आहे. तसेच, 'राजेश शर्मा विरुद्ध स्टेट ऑफ यु.पी.' यांसारख्या महत्त्वपूर्ण निकालांतून न्यायालयाने वैवाहिक वादांतील तक्रारींचे स्वरूप आणि त्यातील तथ्ये पडताळून पाहण्यासाठी संतुलित दृष्टिकोन अंगीकारण्याचे निर्देश दिले आहेत.

परंतु, याचा अर्थ असा मुळीच नाही की, वास्तविक अत्याचारांचे गांभीर्य कमी लेखले जाते. हुंडाबळी, कौटुंबिक हिंसाचार किंवा विवाहित महिलांच्या आत्महत्येसारख्या गंभीर प्रकरणांमध्ये न्यायालयांनी वारंवार हे स्पष्ट केले आहे की, घराच्या चार भिंतींच्या आत घडणाऱ्या अत्याचारांना स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदार असतीलच असे नाही. अशा वेळी पीडितेची साक्ष, परिस्थितीजन्य पुरावे (Circumstantial Evidence) आणि घटनाक्रम यांना न्यायप्रक्रियेत अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले पाहिजे.

न्यायालयीन वास्तव आणि संघर्षः एक विधीज्ञम्हणून न्यायालयीन कामकाजाचे वास्तव अनुभवताना हे प्रकर्षाने जाणवते की, वैवाहिक




वादांमध्ये अनेकदा दुखावलेला अहंकार, गैरसमज, संवादाचा अभाव आणि कायदेशीर संघर्ष यांची गुंतागुंत झालेली असते. काही वेळा अगदी क्षुल्लक वाटणारा कौटुंबिक वाद थेट पोलीस ठाणे, एफआयआर (FIR), घटस्फोट किंवा फौजदारी खटल्याच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचतो. तर दुसरीकडे, खऱ्या अर्थाने अन्यायग्रस्त असलेल्या पीडितेला सबळ पुराव्यांची वानवा, सामाजिक दबाव किंवा कुटुंबाच्या भीतीमुळे न्यायासाठी अत्यंत खडतर संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत, कायद्याचा मूळ उद्देश हा केवळ एखाद्या पक्षाला विजयी करणे हा नसून, वास्तविक पीडितेला कायदेशीर संरक्षण आणि निष्पक्ष न्याय मिळवून देणे हाच असतो.

**मुलांचे भवितव्य आणि 'पालकत्वाची भूमिका'–**

या संपूर्ण कायदेशीर आणि भावनिक संघर्षात सर्वाधिक होरपळ होते ती निष्पाप मुलांची. पती-पत्नीमधील वैमनस्यात, मुलांचा ताबा (Child Custody) हा केवळ अधिकाराचा किंवा प्रतिष्ठेचा विषय बनवला जातो. एकमेकांबद्दलचा राग मुलांवर काढणे किंवा त्यांना दुसऱ्या पालकाविरुद्ध प्रवृत्त करणे, यामुळे मुलांच्या कोवळ्या मानसिकतेवर आणि त्यांच्या भवितव्यावर खोलवर आघात होतो. कायदेशीर परिभाषेत, न्यायालय 'Parens Patriae' (राज्याची पालकत्वाची भूमिका) या तत्त्वानुसार नेहमीच 'मुलांच्या कल्याणाला आणि हिताला' सर्वोच्च प्राधान्य देते. परंतु, कायद्याची कोणतीही तरतूद किंवा न्यायालयाचा कोणताही आदेश, मुलांना त्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या बालपणाची किंवा गमावलेल्या कौटुंबिक छत्राची भरपाई कधीच देऊ शकत नाही, हे पालकांनी गांभीर्याने लक्षात घेणे अत्यावश्यक आहे.

**संवादाचा अभाव–**

सद्यस्थितीतील एक गंभीर सामाजिक समस्या म्हणजे "संवादाचा अस्त." आभासी जग (सोशल मीडिया), दुरावलेला अहंकार, वाढत्या अपेक्षांचे ओझे, आर्थिक तुलना आणि कुटुंबातील अवाजवी हस्तक्षेप यामुळे नात्यांमधील संयम आणि सहनशीलता लोप पावत चालली आहे. अनेकदा केवळ समुपदेशन (Counseling), मध्यस्थी (Mediation) किंवा दोन कुटुंबांतील प्रामाणिक संवादाने सुटू शकणारे प्रश्न थेट न्यायालयाच्या पायरीपर्यंत पोहोचतात. हे वास्तव बदलण्यासाठी केवळ कायदेशीर तरतुदी पुरेशा नसून, सामाजिक संवेदनशीलतेचीही तितकीच नितांत आवश्यकता आहे.

याच कारणामुळे, न्यायालये अनेक प्रकरणांमध्ये समेट, मध्यस्थी आणि जबाबदार वर्तनावर विशेष भर देताना दिसतात. कारण कायदा हे नातेसंबंध टिकवण्यासाठी जबरदस्ती करणारे साधन नाही, आणि ते सूड उगवण्याचे हत्यारही नाही. कायदा ही संरक्षण, जबाबदारी आणि न्याय यांच्यात सुवर्णमध्य साधणारी एक व्यवस्था आहे.

कायदेतज्ज्ञ म्हणून आमची बांधिलकी आणि जबाबदारी ही अशी आहे की, अशा अत्यंत नाजूक व संवेदनशील प्रकरणांत वकिलाची भूमिका केवळ कायदेशीर प्रतिनिधीपुरती मर्यादित राहत नाही. कौटुंबिक कायद्याचा मूलभूत आत्मा 'शक्य तिथे नाते वाचवणे' हा असल्याने, पक्षकाराला पहिल्याच भेटीत थेट कोर्टाची पायरी चढण्याचा किंवा एफआयआर दाखल करण्याचा सल्ला देण्याऐवजी त्यांना या लढ्याचे दूरगामी व कटू परिणाम समजावून देणे ही आमची नैतिक जबाबदारी ठरते. रागाच्या भरात घेतलेले निर्णय भविष्यात किती घातक ठरू शकतात हे स्पष्ट करून त्यांना समुपदेशनासाठी प्रवृत्त करणे हे जबाबदार वकिलाचे प्रमुख कर्तव्य आहे. केवळ खटला जिंकण्यापेक्षा एखादे घर मोडण्यापासून वाचवणे यातच कायद्याचे खरे यश सामावलेले आहे. एक प्रगल्भ समाज म्हणून आपल्याला हे वास्तव स्वीकारावेच लागेल कीप्रत्येक पत्नी खोटी नसते आणि प्रत्येक पती दोषीही नसतो. प्रत्येक सासर अत्याचारी नसते आणि प्रत्येक तक्रार कायद्याचा गैरवापरही नसते. त्यामुळे केवळ भावनेच्या भरात जाऊन, सोशल मीडियावरील अर्धवट माहितीच्या आधारे किंवा एकांगी विचार करण्यापेक्षा; तथ्य, पुरावे आणि न्यायव्यवस्थेवरील अढळ विश्वास या बाबी सर्वाधिक महत्त्वाच्या आहेत.

विवाह हा केवळ संघर्षाचा करार नाही; तर तो अढळ विश्वास, खुला संवाद, परस्पर जबाबदारी आणि सन्मानावर उभा असलेला एक पवित्र सामाजिक संबंध आहे. जेव्हा या नात्याचा पाया कमकुवत होतो, तेव्हा तिथे कायद्याची गरज निर्माण होते. परंतु सरतेशेवटी, कायदा कोणतेही नाते वाचवू शकत नाहीतो केवळ न्याय देण्याचा प्रयत्न करू शकतो; नाती वाचवण्याची आणि ती फुलवण्याची जबाबदारी अंतिमतः समाज, कुटुंब आणि त्या दोन व्यक्तींचीच असते.

**ॲड. सारांश धनंजय सोनार**
**(विधीज्ञ व कायदेविषयक अभ्यासक)**

# अमळनेरच्या राजेंद्र पाटील यांना राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार

## शैक्षणिक, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर :जळगाव येथे आयोजित भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळयात अमळनेर तालुक्यातील मंगरूळ माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक राजेंद्र पाटील यांना राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. शिक्षणासोबत सामाजिक, सांस्कृतिक आणि सहकार क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.

शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व आदर्श कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी 'रिजनल टीचर्स ऑर्गनायझेशन, दापोली' आणि 'प्रादेशिक शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्य' यांच्या संयुक्त विद्यमाने जळगाव येथील अल्पबचत भवनात राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात अमळनेर तालुक्यातील मंगरूळ माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक, हिंदी अध्यापक मंडळाचे अध्यक्ष तसेच पूज्य साने गुरुजी माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पतपेढीचे संचालक राजेंद्र पाटील यांना प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना स्मृतीचिन्ह, मानचिन्ह आणि सन्मानपत्र देण्यात आले. राजेंद्र पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात विद्यार्थीकेंद्री उपक्रम राबवत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. अध्यापनासोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी सहकार, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या याच बहुआयामी कार्याची राज्यस्तरावर दखल घेत त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. या सोहळ्यास शिक्षक आमदार सत्यजित तांबे, रिजनल टीचर्स ऑर्गनायझेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय काशीद, महाराष्ट्र सल्लागार प्रदीप सोनवणे, विराज कावडीया, रणजित सोनवणे, एच. जी. इंगळे, गोविंद पाटील आणि जितेंद्र बोरसे यांच्यासह शिक्षण व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. राजेंद्र पाटील यांना मिळालेल्या या सन्मानामुळे अमळनेर तालुका, शिक्षक वर्ग, शैक्षणिक संस्था तसेच विविध सामाजिक क्षेत्रांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. मित्रपरिवार, हिंदी अध्यापक मंडळाचे पदाधिकारी, सहकारी शिक्षक, विद्यार्थी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार अमळनेर तालुक्यासाठी अभिमानास्पद असून शिक्षण क्षेत्रातील इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.




# रात्रंदिवस सोशल मीडियावर राहतात, पण मुले 'सोशल' होणे का टाळतात? पालक मात्र चिंतेत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : मुलांचा स्क्रीन टाइम वाढण्यामागे आणि प्रत्यक्ष जीवनात 'सोशल' होणे टाळण्यामागे अनेक मानसशास्त्रीय आणि सामाजिक कारणे आहेत. प्रत्यक्ष संभाषणात त्वरित प्रतिक्रिया द्यावी लागते, ज्याची मुलांना भीती वाटते. सोशल मीडियावर मात्र विचार करून, एडिट करून किंवा मेसेज डिलीट करण्याचा पर्याय असतो, जो त्यांना सुरक्षित वाटतो.

पालकांनी मुलांशी संवाद साधून त्यांना प्रत्यक्ष जगातील नात्यांचे महत्त्व समजावून सांगणे आणि स्क्रीन टाइमसाठी काही नियम बनवणे गरजेचे आहे. सततचा स्क्रीन टाइम, 'रील्स' आणि लाइक्सवर आधारित मान्यता यामुळे एन्झायटी, डिप्रेशन आणि आत्मविश्वास कमी होण्याच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे मुले सोशल होणे टाळत आहेत. ही बाब आता पालकांना चिंतेत टाकणारी ठरत आहे.

काय आहे मुलांमधील सोशल फोबीया...

सोशल फोबिया म्हणजे केवळ लाजाळूपणा नसून, सामाजिक किंवा लोकांसमोर येण्याच्या प्रसंगांची वाटणारी तीव्र आणि दीर्घकाळ टिकणारी भीती होय. अस्वस्थता किंवा घबराट वाटणे, हात-पाय किंवा आवाज थरथरणे, खूप जास्त घाम येणे किंवा चेहरा लाल पडणे, हृदयाचे ठोके जलद होणे, चक्कर येणे किंवा मळमळणे अशी लक्षणे दिसतात.पोस्टस, लाइक्स, व्ह्यूज आणि कमेंटसच्या सततच्या दबावामुळे निर्माण होणारा सोशल फोबिया (मानसिक ताण) आजकाल अत्यंत सामान्य झाला आहे. सतत इतरांशी तुलना करणे, मान्यता मिळण्याची हाव आणि नकारात्मक कमेंटसचे भय यामुळे आत्मविश्वास कमी होतो. जगभरातील सुमारे १० ते १५ टक्के मुले या समस्येने ग्रस्त असून, याला सामान्य लाजरेपणा न समजता वेळीच उपचार करणे गरजेचे आहे.

### बोलायला टाळतात...

मुले जर बाहेरच्या लोकांशीच नव्हे, तर घरच्यांशीही बोलणे पूर्णपणे टाळत असतील, तर हे केवळ लाजाळूपणा नसून 'सोशल अँग्झायटी' किंवा 'सिलेक्टिव्ह म्युटिझम'चे लक्षण असू शकते. तू का बोलत नाहीस? किंवा 'सर्वांसमोर बोलायलाच हवे,' असा सतत तगादा लावल्याने मुलांचा ताण वाढतो.

**काय आहेत लक्षणे...**



नवीन लोकांना भेटताना, गर्दीत किंवा कार्यक्रमात स्वतःकडे सर्वांचे लक्ष जाईल या विचाराने धाकधूक वाढणे. अपमानाच्या किंवा टीकेच्या भीतीने कोणत्याही कौटुंबिक, सामाजिक कार्यात किंवा बाहेर जाणे पूर्णपणे थांबवणे. जास्त लोकांमध्ये असताना घाम येणे, थरथरणे, चक्कर येणे किंवा मळमळणे असे त्रास होतात.

जर सोशल मीडियाच्या वापरामुळे चिंता किंवा नैराश्य वाढत असेल, तर मानसोपचारतज्ज्ञ आणि थेरपिस्ट यांच्या मदतीने 'कॉग्निटिव्ह बिहेवियरल थेरपी' घेण्याचा सल्ला दिला जातो. लहानपणापासूनच मोबाइलपासून बालकांना काहीसे दूर ठेवले पाहिजे असे मानसोपचार तज्ज्ञांचे म्हणणे आहे




हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मताशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com


श्री. योगेश गोविंदा महाजन
शहराध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, अमळनेर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!
* शुभेच्छुक *
बसंतलाल बितराई
शंकरलाल बितराई
माजी संचालक, कृ.उ.बा. समिती, अमळनेर
अजय बितराई
हितेश बितराई
दिनेश बितराई
भगवती ट्रेडर्स
मार्केट यार्ड, अमळनेर
कैलास ट्रेडिंग कंपनी
बाजारपेठ, अमळनेर


श्री. योगेश गोविंदा महाजन
शहराध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, अमळनेर
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!
* शुभेच्छुक *
महाजन ट्रेडर्स
जनरल मर्चंट अँन्ड कमिशन एजंट
कृषि उत्पन्न बाजार समिती, मार्केट यार्ड, अमळनेर ४२५ ४०१. (जि. जळगांव)
प्रोप्रा. गोविंदा रतन महाजन
योगेश : 8805486555,9420350393, 8830566011, 7773939888 महेंद्र : 9420070333


श्री. योगेश गोविंदा महाजन
आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!
* शुभेच्छुक *
श्री. युवराज महाजन
श्री. योगेश (बंटी) महाजन
साई पेपर्स अँण्ड मोबाईल शॉप
विजय मारुती मंदिराजवळ, धुळे रोड, अमळनेर


अभीष्टचिंतन
श्री. योगेश गोविंदा महाजन
शहराध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, अमळनेर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!
* शुभेच्छुक *
श्री. लालचंद हेमनदास सैनानी
जिल्हा उपाध्यक्ष : भाजपा, जळगांव (पश्चिम)
मा. उपनगराध्यक्ष : अमळनेर नगरपरिषद, अमळनेर
मा. चेअरमन : अर्बन को-ऑप. बँक, अमळनेर
उपाध्यक्ष : शहर सिंधी जनरल पंचायत, अमळनेर
अध्यक्ष : पान मसाला असोशिएशन, अमळनेर
सदस्य : रोटरी क्लब, अमळनेर


श्री. योगेश गोविंदा महाजन
शहराध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, अमळनेर
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!
* शुभेच्छुक *
ॲड. श्री. नानासो. आर. जी. चव्हाण
निवृत्त तहसिलदार, अमळनेर
सौ. मंगलाताई चव्हाण
अमळनेर


श्री. योगेश गोविंदा महाजन
शहराध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, अमळनेर
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...!
श्री. लक्ष्मण महाजन
व्हा. चेअरमन :
दि अमळनेर को. ऑप अर्बन बँक


अभीष्टचिंतन
शेतकऱ्यांचे कैवारी,
सर्वसामान्यांचे
हितचिंतक आणि युवा पिढीचे
प्रेरणास्थान असलेल्या
लाडक्या नेत्यास
वाढदिवसाच्या
मन:पूर्वक शुभेच्छा.
योगेश गोविंदा महाजन
शहराध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, अमळनेर
श्रीमती. स्मिताताई उदय वाघ
खासदार : जळगाव लोकसभा मतदारसंघ
सौ. भैरवीताई वाघ - पलांडे
भाजप सरचिटणीस, महाराष्ट्र


अभीष्टचिंतन
योगेश गोविंदा महाजन
शहराध्यक्ष : भारतीय जनता पार्टी, अमळनेर
यांना वाढदिवसाच्या
अनंत शुभेच्छा!
॥ शुभेच्छुक ॥
सौ. जयश्री अनिल पाटील
मा. नगराध्यक्षा-अमळनेर नगरपरिषद
मा. सदस्या-जिल्हा परिषद, जळगाव
अध्यक्षा- संजय गांधी निराधार समिती, अमळनेर
गटनेत्या - शहर विकास आघाडी, न.पा. अमळनेर
अनिल भाईदास पाटील
माजी मंत्री
(मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन)
आमदार, अमळनेर विधानसभा मतदारसंघ
समस्त कार्यकर्ते व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष,
अमळनेर विधानसभा मतदारसंघ




# हरसिद्धी माता मंदिर : सती मातेचा उजवा कोपर जिथे पडला होता ते ठिकाण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशभरातील सतीच्या ५१ शक्तीपीठांना विशेष धार्मिक महत्त्व आहे. मध्य प्रदेशातील उज्जैन येथील हरसिद्धी माता मंदिर हे या प्रमुख शक्तीपीठांपैकी एक आहे. महाकालेश्वर ज्योतिर्लिंगाजवळ असलेले हे मंदिर भक्तांमध्ये विशेष श्रद्धेचे केंद्र आहे.नवरात्री आणि इतर धार्मिक प्रसंगी, मोठ्या संख्येने भक्त दर्शनासाठी मंदिराला भेट देतात. मंदिराचे दिव्य वातावरण आणि संध्याकाळी दिव्यांनी सजवलेले स्तंभ विशेषतः भक्तांना आकर्षित करतात.

धार्मिक मान्यतेनुसार, जेव्हा भगवान शिव सतीचे जळते शरीर घेऊन विश्वात फिरत होते, तेव्हा तिच्या शरीराचे अवयव वेगवेगळ्या ठिकाणी पडले. हे अवयव जिथे पडले, त्या ठिकाणी शक्तीपीठे स्थापित करण्यात आली.असे मानले जाते की, उज्जैनमध्ये ज्या ठिकाणी सती मातेचा उजवा कोपर पडला होता, त्या ठिकाणी हर्षसिद्धी माता शक्तीपीठाची स्थापना झाली. यामुळेच हे मंदिर शक्ती आणि भक्तीचे एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते.

**मंदिरात स्थापित तीन देवी**

हर्षसिद्धी माता मंदिरात महालक्ष्मी आणि महासरस्वती यांच्या मूर्ती आहेत. या दोन मूर्तींच्या मध्ये देवी अन्नपूर्णा यांची मूर्ती आहे. मंदिर परिसरात एक श्री यंत्र देखील स्थापित केले असून, त्याची विशेष पूजा केली जाते. भक्त येथे सुख, समृद्धी आणि आपल्या इच्छांच्या पूर्ततेसाठी येतात. मंदिराच्या धार्मिक श्रद्धा आणि वास्तुकला यांनाही या स्थळासाठी विशेष महत्त्व आहे.



**स्कंद पुराणात उल्लेख**

स्कंद पुराणात देवी चंडीला हर्षसिद्धी ही उपाधी मिळाल्याची कथा सांगितली आहे. पौराणिक कथेनुसार, भगवान शिव आणि देवी पार्वती कैलास पर्वतावर एकांतात असताना चंड आणि प्रचंड नावाचे दोन राक्षस तेथे आले. भगवान शिवाच्या आवाहनाने देवी चंडीने दोन राक्षसांचा वध केला. यामुळे प्रसन्न होऊन महादेवाने देवीला 'हर्षसिद्धी' ही उपाधी प्रदान केली.येथील दीपस्तंभ आकर्षणाचे केंद्र बनले आहेत. मराठा काळात मंदिराची पुनर्बांधणी करण्यात आली. येथील दोन भव्य दीपस्तंभ भक्तांसाठी एक विशेष आकर्षण आहेत. दररोज संध्याकाळी या स्तंभांवर दिवे लावले जातात, ज्यामुळे संपूर्ण मंदिर परिसर एका दिव्य प्रकाशाने उजळून निघतो. हे अद्भुत दृश्य पाहण्यासाठी दूरदूरहून भक्त उज्जैनला येतात.

# लक्ष्मी जी जगन्नाथ जी को छोड़कर कहां जा रही हैं?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



एक बार लक्ष्मी जी जगन्नाथ पूरी में भ्रमण कर रही थीं। उनका मन हुआ कि किसी भक्त पर कृपा की जाए। तभी उन्होंने सोचा कि पहले हमारे प्राणनाथ के जो अर्चक हैं, जो उनकी नित्य सेवा करते हैं मंदिर में, मैं उनके घर जाकर देखती हूंअगर किसी पर कृपा करना हो तो।

तो लक्ष्मी जी उन अर्चकों के घर गईं और देखा कि सूर्योदय हो गया है और सब अभी तक सो रहे हैं। घर में कोई स्वच्छता नहीं है। सारे सामान बिखरे पड़े हैं। रात का भोजन सब खाया हुआ है।

लक्ष्मी जी ने कहा"मैं यहां नहीं रुकूंगी और ना ही मुझे कृपा करनी है। यह मेरे रहने के योग्य स्थान नहीं है।" और लक्ष्मी जी वहां से चली गईं।

अब लक्ष्मी जी उस व्यक्ति के घर गईं, जो मंदिर में झाड़ू लगाने की सेवा करता था और जिसे मंदिर में घुसने भी नहीं दिया जाता था। उनके घर में सब ब्रह्म मुहूर्त में उठ जाते हैं। घर में बढ़िया गोबर का चौका लगाया जा रहा है। तुलसी जी को जल चढ़ाया जा रहा है। ठाकुर जी को भोग लगाया जा रहा है।

लक्ष्मी जी बोलीं"यह है मेरे रहने का योग्य स्थान।"

और साक्षात लक्ष्मी जी वहां प्रकट हो गईं।

वह दोनों दंपत्ति चौंक गए। उन्होंने पूछा"देवी, आप कौन हैं?"

लक्ष्मी जी ने कहा"हम लक्ष्मी हैं, जगन्नाथ भगवान की पत्नी।"

सब बोले"देवी, आप अचानक यहां कैसे?"

लक्ष्मी जी ने कहा"तुम्हारे इस सेवा भाव, पवित्रता, तुलसी निष्ठा और घर की शुद्धता देखकर हम बहुत प्रसन्न हुए हैं।"

सब बोले"जय हो लक्ष्मी जी! यह तो हमारा सौभाग्य है।"

लक्ष्मी जी ने कहा"मैं तुम्हारे घर आई हूं और मुझे प्रसाद नहीं परोसोगे?"

सब बोले"हां-हां, आप बैठिए।"

उन्होंने लक्ष्मी जी को आसन पर बिठाया और प्रसाद परोसा।

उधर बलराम जी पूरी में घूम रहे थे। तभी खिड़की से झांककर देखा कि लक्ष्मी जी किसी दूसरे के घर में भोजन कर रही हैं।

उन्हें बहुत क्रोध आया।

वो बोले"इनका कुल कितना नीचा है! शुद्धता भी नहीं होगी घर में, और इनके घर लक्ष्मी जी भोजन कर रही हैं! आने दो इन्हें!"

बलराम जी क्रोध में वहां से चले गए।

उधर लक्ष्मी जी ने भी कहा"अभी तो हम जा रहे हैं, हम फिर आएंगे।" और वे चली गईं।

जैसे ही लक्ष्मी जी बैकुंठ पहुंचीं, देखाबलराम जी रूठे बैठे हैं और जगन्नाथ जी और सुभद्रा जी उन्हें मना रहे हैं।

बलराम जी कह रहे थे"आचार-विचार सब भूल गए हैं। शुद्धता-पवित्रता का कोई ध्यान नहीं है। परमात्मा होते हुए भी बुद्धि भ्रष्ट हो गई है।"

तभी लक्ष्मी जी आईं और बोलीं"आप सब प्रसाद पाने बैठिए, मैं लेकर आती हूं।"

जगन्नाथ जी और सुभद्रा जी तो बैठ गए, लेकिन बलराम जी अड़े रहे।

जगन्नाथ जी बोले"भैया आइए, प्रसाद पाइए।"

बलराम जी बोले"मैं लक्ष्मी के हाथ का बना प्रसाद नहीं खाऊंगा। आचार-विचार सब भूल गई हैं।" लक्ष्मी जी सब सुन रही थीं।

जगन्नाथ जी दुविधा में पड़ गएइधर प्रसाद खाएंगे तो भैया नाराज, उधर नहीं खाएंगे तो लक्ष्मी जी नाराज। उन्होंने सोचा"लक्ष्मी जी को तो मना सकता हूं, पर भैया को नहीं।"

और उन्होंने भी प्रसाद नहीं खाया।

दो-तीन दिन ऐसा ही चलता रहा।

फिर लक्ष्मी जी ने कहा "जब मेरे हाथ का कोई प्रसाद ही नहीं खाता, तो मैं यहां नहीं रहूंगी।" और वे उन्हें छोड़कर चली गईं।

लक्ष्मी जी के जाते ही सारी श्री चली गई।

जगन्नाथ जी और बलराम जी हैरान हो गए।

बलराम जी बोले"यह क्या हो गया?"

जगन्नाथ जी बोले"लक्ष्मी जी चली गईं, इसलिए सब कुछ चला गया।" बलराम जी बोले"कोई बात नहीं, हम खुद भोजन बना लेते हैं।" लेकिन रसोई में गए तो देखासारी सामग्री गायब! फिर दोनों बालक रूप में स्वर्ग द्वार पर जाकर बैठ गए और बोले

"जय जगन्नाथ कुछ दे दो"

एक स्त्री आई, उसने डांट दिया।

फिर एक संत आए, उन्होंने मुरी (लाई) दी। जैसे ही खाने लगे, तेज हवा चली और सारी मुरी उड़ गई।

दोनों उसके पीछे दौड़े फिर थक गए।

जगन्नाथ जी बोले"भैया, लक्ष्मी जी से क्षमा मांग लो।"

बलराम जी बोले"ठीक है, पर वो मिलेंगी कहां?"

जगन्नाथ जी बोले"जहां सबसे ज्यादा श्री होगी, वहीं मिलेंगी।"

घूमते-घूमते एक घर दिखा जहां बहुत समृद्धि थी।

वहां एक बालक वस्त्रदान कर रहा था।

दोनों लाइन में खड़े हो गए।

लक्ष्मी जी ने देखा पहचान लिया।

उन्होंने उन्हें बुलवाया।

दोनों सिर झुकाकर खड़े हो गए।

बलराम जी बोले"बहू, मुझसे गलती हो गई"

फिर बोले"पर तेरी भी गलती है"

जगन्नाथ जी कोहनी मारते हुए बोले"चुप रहो"

लक्ष्मी जी बोलीं "आप लोग किसी के घर जाते हैं, तब जाति नहीं देखते। और जब मैं किसी पर कृपा करना चाहूं तो मुझे रोका जाता है?" "मनुष्य को उसके जन्म से नहीं, उसके कर्म और व्यवहार से पहचानना चाहिए।"

"जो कर्म से शुद्ध है, वही शुद्ध है।"बलराम जी और जगन्नाथ जी मान गए। उन्होंने कहा"एक नियम बना दीजिए।" लक्ष्मी जी बोलीं "पुरी में ऐसा नियम हो कि महाप्रसाद सबके लिए समान होचाहे ब्राह्मण हो या शूद्र।" "अगर एक ही पत्तल में साथ खाएं, तो भी समान पुण्य मिले।"

"कोई भेदभाव नहीं होगा।" दोनों ने यह नियम स्वीकार किया। तभी से जगन्नाथ मंदिर में महाप्रसाद सबके लिए समान हो गया। भगवान सबके लिए सुलभ हो गए।

जय जगन्नाथ

## छत्तीसगडमधील एक अद्वितीय मंदिर...फक्त ५ तासांसाठी उघडतात, महिलांना प्रवेश करण्यास मनाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

छत्तीसगडच्या धमतरी आणि गरियाबंद जिल्ह्यांच्या सीमेवर, घनदाट जंगल आणि उंच टेकड्यांमध्ये वसलेले एक मंदिर आहे, ज्याच्या श्रद्धा जितक्या कठोर आहेत, तितक्याच त्या चमत्कारिकही आहेत. आम्ही बोलत आहोत निराई माता मंदिराविषयी, जिथे आधुनिक युगातही परंपरा कुतूहलाचा विषय बनून राहिल्या आहेत.

**भक्तांची श्रद्धा आणि 'स्वयंभू' ज्योतीचे रहस्य**

निराई माता मंदिर हे काही सामान्य मंदिर नाही. या मंदिराचे सर्वात लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे येथे तेवत असलेली पवित्र, शाश्वत ज्योत. स्थानिक गावकरी आणि भक्तांचा असा दृढ विश्वास आहे की नवरात्रीदरम्यान ही ज्योत तेल किंवा तुपाने नव्हे, तर दैवी शक्तीने प्रज्वलित होते. खडतर मार्ग आणि उंचसखल टेकड्या असूनही, देवी मातेप्रती असलेली अगाध भक्ती भक्तांना येथे आकर्षित करते.

**वर्षातून फक्त ५ तासांसाठी दर्शन**

या मंदिराचे दरवाजे वर्षभर बंद असतात. परंपरेनुसार, देवीचे गर्भगृह फक्त चैत्र नवरात्रीच्या पहिल्या रविवारी उघडले जाते. आणि तेही फक्त पाच तासांसाठी. या मर्यादित वेळेत, हजारो पुरुष भक्त देवीचा आशीर्वाद घेण्यासाठी आणि आपल्या इच्छा पूर्ण व्हाव्यात म्हणून प्रार्थना करण्यासाठी देवीचे दर्शन घेतात.

**महिलांना प्रवेश करण्यास मनाई का आहे?**

एका शतकांपूर्वीच्या आख्यायिकेनुसार, प्राचीन काळी, निराई माता नावाचा एक बैगा पुजारी तिच्या सेवेवर अत्यंत प्रसन्न होता. ती स्वतः त्याला भोजन आणि स्नान घालत असे. तथापि, जेव्हा पुजाऱ्याच्या



पत्नीला संशय आला, तेव्हा देवी क्रोधित झाली. तिने असा आदेश दिला की भविष्यात कोणत्याही स्त्रीला तिचे दर्शन घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. तेव्हापासून आजपर्यंत, महिलांना या मंदिरात प्रवेश करण्यास आणि प्रसाद स्वीकारण्यास सक्त मनाई आहे. असे मानले जाते की जर एखादी स्त्री मंदिराच्या आवारात प्रवेश करते किंवा प्रसाद स्वीकारते, तर तिच्यावर संकट ओढवते.

**पूजा कडक नियमांनुसार**

निराई मातेच्या पूजेचे नियम इतर देवी मंदिरांपेक्षा पूर्णपणे वेगळे आहेत. मंदिरात जाण्यापूर्वी पुरुषांनाही कडक नियमांचे पालन करावे लागते.लाल रंगाचे कपडे आणि मेकअप करण्यास मनाई आहे.देवीला सिंदूर, कुंकू, गुलाल किंवा सुहागाच्या इतर कोणत्याही वस्तू अर्पण केल्या जात नाहीत. मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी भक्तांनी आपला कमरपट्टा, लाल रंगाचे कपडे आणि कपाळावरील टिळा काढला पाहिजे. देवी केवळ नारळ आणि उदबत्त्यांनीच प्रसन्न होते.

**चैत्र नवरात्रीची विशेष जत्रा**

मंदिराचा मार्ग अत्यंत खडतर असला तरी, चैत्र नवरात्रीच्या पहिल्या रविवारी येथील दृश्य एखाद्या भव्य जत्रेसारखे असते. या अल्पकाळात देवीचे दर्शन घेण्यासाठी दूरदूरहून आलेले भक्त तासन्तास रांगेत उभे राहतात. लोकांचा असा विश्वास आहे की जो भक्त येथे खऱ्या मनाने नारळ अर्पण करतो, निराई माता त्याची झोळी कधीही रिकामी ठेवत नाही.

# आर्थिक समृद्धी आणि देवी लक्ष्मीची कृपा मिळवण्यासाठी प्रभावी उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



देवी लक्ष्मी ही धन, वैभव आणि ऐश्वर्याची अधिष्ठात्री देवी आहे. आर्थिक अडचणी दूर करून घरात सुख-समृद्धी नांदावी यासाठी केवळ चालीसा पठणच नव्हे, तर खालील उपाय अत्यंत प्रभावी ठरतात.

**आर्थिक उन्नतीसाठी काही विशेष उपाय**

**शुक्रवारी लक्ष्मी पूजन :** दर शुक्रवारी देवी लक्ष्मीच्या मंदिरात जाऊन किंवा घरीच फोटोसमोर कमळाचे फूल किंवा गुलाबी रंगाची फुले अर्पण करा.

**अखंड दिवा :** शुक्रवारी संध्याकाळी घराच्या मुख्य दरवाजाच्या उंबरठ्यावर तुपाचा दिवा लावावा. यामुळे घरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होते आणि लक्ष्मीचे आगमन होते.

**श्री यंत्राची स्थापना :** घराच्या तिजोरीत किंवा पूजागृहात 'श्री यंत्र' स्थापित करून त्याची नियमित पूजा केल्याने आर्थिक प्रगतीचे मार्ग मोकळे होतात.

**पांढऱ्या मिठाईचा नैवेद्य :** देवी लक्ष्मीला शुक्रवारी पांढऱ्या रंगाची मिठाई किंवा खिरीचा नैवेद्य दाखवल्याने ती लवकर प्रसन्न होते.

**तिजोरीची स्वच्छता :** घराची तिजोरी नेहमी स्वच्छ ठेवा आणि तिथे सुगंधित द्रव्ये किंवा अत्तर ठेवा. रिकामी तिजोरी कधीही ठेवू नका.

**दान-धर्म :** आर्थिक अडचणीतून बाहेर पडण्यासाठी आपल्या कमाईतील काही हिस्सा गरजू व्यक्तींना किंवा मंदिरात दान करा. दान केल्याने लक्ष्मीची कृपा दुप्पट मिळते.

**काही महत्त्वपूर्ण नियम**

**महत्त्वाची टीप :** देवी लक्ष्मीचा वास तिथेच असतो जिथे स्वच्छता आणि प्रसन्नता असते. त्यामुळे घरात कचरा साचू देऊ नका आणि कोणाबद्दलही वाईट विचार करू नका.

**खालील मंत्राचा जप करा (किमान १०८ वेळा):**

**मंत्र: "ॐ श्रीं ह्रीं श्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्रीं ॐ महालक्ष्म्यै नमः॥"**

शुक्रवार हा धन आणि समृद्धीची देवी, लक्ष्मीला समर्पित आहे. असे मानले जाते की या दिवशी भक्ती आणि श्रद्धेने तिची पूजा केल्याने ती लवकर प्रसन्न होते. विशेषतः श्री लक्ष्मी चालिसाचे पठण करणे अत्यंत शुभ मानले जाते.

नियमित पठणामुळे केवळ आर्थिक स्थितीच सुधारत नाही, तर जीवनात आनंद, शांती आणि सकारात्मकता देखील येते. चला, शुक्रवारी लक्ष्मी चालिसा पठण करण्याचे फायदे आणि योग्य पद्धत जाणून घेऊया.

**श्री लक्ष्मी चालिसा विशेष का आहे?**

श्री लक्ष्मी चालिसा हे ४० श्लोकांचे एक पवित्र स्तोत्र आहे, जे देवी लक्ष्मीचे गुण, रूप आणि महिमा यांचे सुंदर वर्णन करते. याच्या पठणामुळे मनाला शांती मिळते, नकारात्मकता दूर होते आणि घरात सकारात्मक ऊर्जा संचारते. धार्मिक श्रद्धेनुसार, या पठणामुळे धन, समृद्धी, सन्मान आणि सुख प्राप्त होते.

शुक्रवारी लक्ष्मी चालिसा पठण करण्याची पद्धत शुक्रवारी सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्रे परिधान करा. गुलाबी किंवा लाल रंगाचे कपडे घालणे शुभ मानले जाते.पूजास्थळ स्वच्छ करून देवी लक्ष्मीची मूर्ती किंवा चित्र स्थापित करा.तुपाचा दिवा लावा आणि उदबत्त्या अर्पण करा.

देवी लक्ष्मीला लाल किंवा गुलाबी फुले, खडीसाखर, खीर किंवा कोणताही गोड पदार्थ अर्पण करा.मनात निश्चय करून पूर्ण भक्तीभावाने लक्ष्मी चालिसा पठण करा.पठणानंतर देवी लक्ष्मीची आरती करा आणि आपल्या इच्छा व्यक्त करा.

**नियमित पठणाचे फायदे**

**धनात वाढ –** आर्थिक समस्या दूर होतात आणि उत्पन्नाचे नवीन मार्ग खुले होतात.

**कौटुंबिक सुख –** घरात शांतता नांदते आणि नातेसंबंध दृढ होतात.

**मानसिक शांती –** तणाव आणि चिंता कमी होतात.

**सकारात्मक ऊर्जा –** तुम्हाला जीवनात आत्मविश्वास आणि यश अनुभवायला मिळते.

जर तुम्हाला तुमच्या जीवनात धन, सुख आणि समृद्धी हवी असेल, तर प्रत्येक शुक्रवारी भक्तिभावाने लक्ष्मी चालिसाचे पठण नक्की करा. धार्मिक मान्यतेनुसार, यामुळे देवी लक्ष्मीचा आशीर्वाद मिळतो आणि जीवन सुखी होते.

